**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**

शासन निर्णय क्रमांक:-एचडीई-०१०६/प्र.क्र.७७८(भाग-२)/आस्थापना-२,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक :-२३ नोव्हेंबर, २००९.

**प्रस्तावना:-**

सामान्य प्रशासन विभागाच्या महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ८ (१) मधील तरतूदीनुसार प्रत्येक विभागास नागरिकांची सनद तयार करुन प्रसिध्द करणे आवश्यक होते. उत्तम प्रशासनाच्या बाबतीत नियंत्रण व संतुलन राखण्याकरिता त्याचप्रमाणे पारदर्शकता आणणे आवश्यक असल्यामुळे नागरिकांची सनद प्रसिध्द करण्याची आवश्यकता आहे.

**शासन निर्णय:-**

उपरोक्त प्रस्तावनेत नमूद धोरणात्मक बाबींची पूर्तता करण्यासाठी व या विभागाच्या कामकाजासंबंधात नागरिकांना मार्गदर्शन करण्यासाठी या अन्वये गृह विभागाची **"नागरिकांची सनद"** प्रसिध्द करण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**( ज. जि. वळवी )**
कार्यासन अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) अपर मुख्य सचिव(गृह) यांचे प्रशासकीय अधिकारी,
२) प्रधान सचिव(विशेष) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
३) प्रधान सचिव(अ. व सु.)/सचिव(परिवहन, बंदरे व रा.ऊ.शु.) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग,मंत्रालय, मुंबई,
४) गृह विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी,
५) गृह विभागातील सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी,
६) उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन-१८ अ, मंत्रालय, मुंबई,
७) सर्व मंत्रालयीन विभाग
८) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, तळमजला, मंत्रालय (वर्तमानपत्रातून बातमीच्या स्वरुपात प्रसिध्दी देण्यात यावी या विनंतीसह)

९) एमआयएस कोऑर्डिनेटर, गृह विभाग, मंत्रालय (यांनी सदर नागरिकांची सनद तात्काळ शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करुन त्याबाबतचा अहवाल कार्यासन आस्था-२ मध्ये सादर करावा.)

१०) संचालक, मध्यवर्ती शासकीय मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई
यांनी सोबत जोडलेल्या या विभागाच्या नागरिकांच्या सनदेचे अंतिम मुद्रीत तयार करुन दोन हजार प्रती छापून पुरविण्यात याव्यात अशी विनंती.

११) निवडनस्ती/वैयक्तिक नस्ती, आस्थापना-२, गृह विभाग.

## ***नागरिकांची सनद***

गृह विभाग हा महाराष्ट्र शासनाचा एक अत्यंत महत्वाचा विभाग आहे. या विभागामार्फत राज्यातील 'कायदा व सुव्यवस्था' राखण्याचे काम करण्यात येते. प्रशासनिक सोयी आणि कार्यक्षमतेसाठी गृह विभागाचे 'कायदा व सुव्यवस्था' आणि परिवहन असे दोन विभाग करण्यात आले होते. नंतर परिवहन विभागाचे विभाजन करुन दोन नवीन भाग (१) परिवहन व तुरुंग (२) राज्य उत्पादन शुल्क असे दि.१६ डिसेंबर, १९८५ पासून करण्यात आले आहेत. गुन्हे प्रतिबंध व अन्वेषण कायदा व सुव्यवस्थेचे पालन, पोलीस होमगार्ड व नागरी संरक्षण यांचे प्रशासन व नियंत्रण आणि न्याय, प्रशासन तसेच गृह (मंत्रालय) विभागाची आस्थापना अशी विभागाची सर्वसाधारण रचना आहे. विभागाचे कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यासाठी विभागात एकूण ५२ कार्यासने निर्माण करण्यात आली आहेत.

## ***गृह विभागाची मुख्य कार्य***

सार्वजनिक सुव्यवस्था राखणे, पोलीस दलाचे संपूर्ण पर्यवेक्षण करणे, पोलीस दलाकडून झालेल्या चूका व अतिरेकाची चौकशी करणे. पोलीस दलाचे आधुनिकिकरण करणे, पदांची, पोलीस ठाण्याची /पोलीस चौक्यांची निर्मिती करणे. पोलीस गोळीबाराची दंडाधिकारीय/न्यायिक चौकशी करणे, पोलीस आस्थापनाविषयक प्रकरणे, पोलीस कल्याण, पोलीस गृह निर्माण व इमारती आणि पोलीसांना साधनसामुग्री पुरविणे.

## ***गृह विभागाच्या नियंत्रणाखालील विभाग /कार्यालय***

१) पोलीस विभाग

२) गृहरक्षक दल

३) नागरी संरक्षण दल

४) तुरुंग

५) राज्य उत्पादन शुल्क

६) परिवहन

७) बंदरे

८) सरकारी अभियोग संचालनालय

## *गृह विभागाच्या जबाबदाऱ्या*

१) शस्त्र अधिनियम, मुंबई पोलीस अधिनियम, सिनेमा अधिनियम व त्याखाली केलेले नियम व विनियमन या अन्वये केलेली अपिले हाताळणे.

२) अर्थसंकल्पात निधींची तरतूद करणे व तिचे वितरण/नियत वाटप करणे.

३) कायदा व सुव्यवस्था, अति-महत्वाच्या व्यक्तिंची सुरक्षा, राज्याचे अंतर्गत व किनारी संरक्षण, अति-महत्वाची मोर्चे बांधणी (इन्स्टॉलेशन), धार्मिक स्थळे इत्यादी संबंधी बाबी हाताळणे.

४) दहशतवादी/नक्षलवादी कृत्यांशी संबंधीत बाबी हाताळणे.

५) राष्ट्रीय सुरक्षा अधिनियम, १९८० खालील प्रतिबंधात्मक स्थानबध्दतेबाबतची प्रकरणे हाताळणे

६) विदेशी चलन व चोरट्या व्यापारास प्रतिबंध अधिनियम, १९७४ बाबत प्रकरणे हाताळणे.

७) महाराष्ट्र गैरकृत्यांचे उल्लंघन अधिनियम, १९८० बाबतची प्रकरणे हाताळणे.

८) झोपडपट्टी दादा, हातभट्टी वाले, अंमली पदार्थांचे व्यापर करणारे व धोकादायक व्यक्ति यांची कृत्ये अधिनियम १९८१ (१९८१ चा एम.पी.डी.ए.अधिनियम) शी संबंधीत प्रकरणे हाताळणे.

९) काळ्याबाजारास प्रतिबंध व अत्यावश्यक वस्तुंचा पुरवठा करणे विषयक अधिनियम, १९८० इत्यादीबाबतची प्रकरणे हाताळणे.

१०) मुंबई लॉटरी (नियंत्रण व कर), बक्षीस स्पर्धा अधिनियम १९५८ तसेच बक्षीस स्पर्धा नियम अधिनियम १९५५ बाबतची प्रकरणे हाताळणे.

११) पैजा लावणे व जुगार खेळणे यासंबंधीची प्रकरणे हाताळणे.

१२) सिनेमा (भारतीय चित्रपटांची निर्मिती व वितरण करण्यास उत्तेजन देणे आणि शैक्षणिक, वैज्ञानिक व मनोरंजन चित्रपटांचे प्रदर्शन व वापर या खेरीज) परवाना देणे व नियंत्रण ठेवणे.

१३) राज्याच्या सुरक्षिततेच्या संबंधातील कारवाईसाठी केलेली प्रतिबंधात्मक स्थानबध्दता, सार्वजनिक सुव्यवस्था राखणे किंवा समाजाला अत्यावश्यक वस्तु व सेवा यांचा पुरवठा करणे यांच्याशी संबंधित स्थानबध्दतेला अधिन असलेल्या व्यक्तिची प्रकरणे हाताळणे.

१४) राजद्रोहात्मक बैठका घेण्याच्या कृतीसह राज्याविरोधी केलेले सर्व अपराध आणि १९०८ ची फौजदारी कायद्यातील सुधारणा इत्यादी बाबींची प्रकरणे हाताळणे.

१५) राजकीय सामाजिक आंदोलने आणि घातपाती कारवाया आणि त्या हाताळण्यासाठी करावयाच्या प्रतिबंधक उपाययोजना

१६) तसेच विलक्षण घटना, आंतर- सामाजिक संबंध, दंगे, विक्षोभ.

१७) कायद्यांविरुध्द अपराध

१८) फौजदारी प्रक्रिया संहितेखालील खटले मागे घेणे/काढून घेणे.

१९) गुन्हेगार वेडे, सिध्दापराधी व वेडे सिध्द करण्याची प्रक्रिया.

२०) स्फोटके:- नियंत्रण, वाहतूक, साठवण, उत्पादन, पेट्रोलीयम अधिनियम १९५४ खालील पेट्रोलीयम व इतर ज्वलनशिल पदार्थांचे परिक्षण व संमिश्रण कार्बाईड व कॅल्शीयम नियम.

२१) पुरलेल्या मयत व्यक्ती उकरुन काढणे, हरवलेल्या व्यक्ती, मयत व्यक्तींची संपदा

२२) शस्त्रास्त्रे, अग्निशस्त्रे व दारुगोळा,

२३) कार्यकारी दंडाधिकाऱ्यांचे दंडाधिकारीय अधिकार देणे /काढून घेणे.

२४) (एक) भारताची अंतर्गत सुरक्षा व संरक्षण (नौदल, भूदल किंवा वायुदल), अंतर्गत सुरक्षेशी संबंधीत असणाऱ्या बाबी (मुलकी अधिकारांचा वापर करताना नौदलाचा, भूदलाचा किंवा वायुदलाचा वापर करण्यासह)

(दोन) साह्यकारी व भारतीय प्रादेशिक सेनादले.

(तीन) भारतीय स्थलसेवेच्या अधिकाऱ्यांच्या पदोन्नत्या,

(चार) सैन्याची सेवाप्रवेश व वाहतूक,

(पाच) इतर संकीर्ण सैन्यविषयक बाबी,

यांसह नौदल, भूदल व वायुदल आणि इतर कोणतीही सशस्त्र दले आणि संधीय केंद्रीय गुप्तवार्ता व अन्वेषण संस्था.

२५) चिन्ह व नावे (अनुचित वापर करण्यास प्रतिबंध) अधिनियम, १९५०

२६) परराष्ट्रीय व्यवहार, परकीय देशांशी संधी व करार करणे आणि परकीय देशांशी केलेल्या प्रत्यर्पण संधीची, करारांची व अभिसंधीची अंमलबजावणी करणे.

२७) भारतामध्ये प्रवेश देणे आणि भारतातून स्थलांतर करणे व हद्दपार करणे, भारतातील विदेशी धर्मप्रचारक, भारताबाहेरील ठिकाणाच्या तीर्थयात्रा.

२८) नागरिकत्व.

२९) संरक्षण, मूळ व्यवहार किंवा भारताची सुरक्षा या संबंधातील कारणांसाठी प्रतिबंधात्मक स्थानबध्दता, अशा प्रकारे स्थानबध्द केलेल्या व्यक्ति.

३०) पारपत्र व प्रवेशपत्र (व्हिसा).

३१) विदेशी व्यक्तिंचे प्रत्यार्पण.

३२) वय व राष्ट्रीयत्व यांची प्रमाणपत्रे.

३३) नागरी संरक्षण, गृह रक्षक दल, ग्राम संरक्षण पथके व तत्संबंधित बाबी.

**गृह रक्षक दल**

१) गृहरक्षक संघटनेच्या वेतनी अधिकाऱ्यांची व जिल्हा समादेशकांची (मानसेवी) नियुक्ती.

२) वेतनी व मानसेवी कर्मचाऱ्यांच्या अपिलांसह गृहरक्षक दल संघटनेची स्थापना.

३) मुंबई गृहरक्षक दल अधिनियम १९४७ व गृहरक्षक दल नियम १९५३ यांच्याशी संबंधित असणाऱ्या बाबी.

४) केंद्र शासनाकडून गृहरक्षक दल संघटनेवर केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती.

५) आणीबाणीच्या काळात गृहरक्षक दल तैनात करणे.

**नागरी संरक्षण दल.**

१) नागरी संरक्षण दल संघटनेच्या वेतनदेयी अधिकाऱ्याची (मानसेवी) नियुक्ती.

२) नागरी संरक्षण दल संघटनेची स्थापना.

३) नागरी संरक्षण दल अधिनियम, १९६८ शी संबंधित असणाऱ्या बाबी.

४) नागरी संरक्षण दल संघटनेवर केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती.

५) आणीबाणीच्या काळात नागरी संरक्षण दल तैनात करणे.

**सरकारी अभियोग संचालनालय**

१) राज्य शासनाच्या वतीने फौजदारी न्यायालयांमध्ये फौजदारी न्यायचौकशी करणे आणि संबंधित कायद्याचे उचित दंडकारी कलमे लावण्याबाबत पोलीसांना व इतर शासकीय विभागांच्या कार्यालयांना कायद्याचा सल्ला देणे.

२) अपील व पुनरीक्षण अर्ज दाखल करणे.

३) दंडाधिकाऱ्याकडून, सत्र व उच्च न्यायालयांकडून दोषमुक्त केलेल्या प्रकरणांची छाननी करणे आणि अपील करावे किंवा करु नये हे ठरविणे.

<u>**न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा**</u>

१) न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाच्या आस्थापनाविषयक बाबी.

२) न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांचे आधुनिकिकरण.

३) जे.जे.शवविच्छेदन केंद्र भायखळा, येथील आस्थापना विषयक बाबी.

४) पोलीस दलाच्या वाहन यंत्र, सामुग्री, साधन सामुग्री, गणवेष इत्यादी विषयक बाबी.

<u>**तुरुंग**</u>

१) जन्मठेपेची शिक्षा झालेल्या कैद्यांची मुदतीपूर्वी मुक्तता करणे.

२) वैद्यकीय कारणांवरुन कैद्यांची मुदतीपूर्वी मुक्तता करणे.

३) घटनेच्या अनुच्छेद १६१ स्थायी कैद्यांना माफी देण्याबाबत मा.राज्यपाल महोदयांकडे शिफारस करणे.

४) असाधारण कामाबद्दल कैद्यांना माफी देणे.

५) विशेष प्रसंगी म्हणजेच दि.१५ ऑगस्ट, २६ जानेवारी, २ ऑक्टोबर, १४ एप्रिल रोजी माफी जाहिर करणे.

६) पोलीस अन्वेषणासाठी आवश्यक असलेल्या सिध्दापराधीची शिक्षा तात्पुरती निलंबित करणे.

७) मनोरुग्ण असलेल्या कैद्यांचे हस्तांतरण व मुक्तता.

८) मुक्त निवासासाठी कैद्यांचे हस्तांतरण करणे.

९) आवश्यक असेल तेव्हा, विद्यमान नियमांमध्ये फेरबदल करणे.

१०) आवश्यक असेल तेव्हा, तात्पुरते कारागृह घोषित करणे.

११) अ/ब वर्ग (राजपत्रित) पदांची नियुक्ती करणे.

१२) कैद्यांच्या अभिवचन रजेच्या अपिल अर्जावर निर्णय घेणे.

१३) कारागृहांचे बांधकाम करणे, कारागृहांचे कारागृह उद्योगांचे आधुनिकीकरण करणे.

१४) मुक्त कारागृह, किशोर सुधार शाळा, महिलांकरिता खुले कारागृह सुरु करणे.

**<u>राज्य उत्पादन शुल्क</u>**

१) मादक द्रव्ये अफूच्या बाबतीत भारतीय संविधानाच्या सातव्या अनुसूचितील सूची एक मधील नोंद क्र.५९ च्या तरतुदींस अधीन राहून मद्य, औषधिद्रव्ये (धोकादायक औषधिद्रव्यांसह) व विषारीद्रव्ये यांचे उत्पादन करणे, निर्मिती करणे ते बाळगणे, त्यांची वाहतूक करणे, त्यांची खरेदी व विक्री करणे, दारुबंदी शिक्षण वगळून सेवन करण्याच्या प्रयोजनार्थ मादक द्रव्ये व औषधीद्रव्ये यांचा वापर करण्यास मनाई करणे.

२) राज्यात निर्माण झालेल्या किंवा उत्पादित केलेल्या पुढील मालावरील राज्य उत्पादन शुल्क आणि भारतात अन्यत्र निर्माण झालेल्या किंवा उत्पादित केलेल्या तत्सम मालावर त्याच दराने किंवा निम्न दराने शुल्क आकारणे.

३) मानवी सेवनासाठी असलेले अल्कोहोलिक मद्य

४) अल्कोहोलचा समावेश असणारी औषधी व प्रसाधन सामग्री.

५) अफू, भारतीय भांग व इतर गुंगीकारक औषधीद्रव्ये व अंमली पदार्थ

६) अफू लागवड व वस्तूनिर्मिती किंवा निर्यात करण्यासाठीची विक्री.

७) भारतातील राज्यांबरोबर राज्य उत्पादन शुल्क करार.

८) काकवीचे (मळीचे) नियंत्रण व नियत वाटप.

**<u>परिवहन</u>**

१) यंत्रचलित वाहने, मोटार वाहने व सार्वजनिक वाहने मोटार वाहने (शासकीय कोट्यातून मोटार कार, स्कूटर्स व यंत्रचलित अन्य वाहने देण्याशी संबंधित असणाऱ्या बाबी वगळून)

२) मार्ग परिवहन सेवा.

३) रस्त्यावर वापर करण्यास योग्य असलेल्या वाहनांवरील कर मग ते यंत्रचलित असतील किंवा नसतील.

४) रस्त्याने वाहून नेलेल्या मालांवरील व उतारुंवरील कर.

५) मोटार कार (वितरण व विक्री) नियंत्रण आदेश, १९५० स्कूटर्स (वितरण व विक्री) नियंत्रण आदेश, १९६० व ट्रॅक्टर्स (वितरण व विक्री) नियंत्रण आदेश, १९७१

६) महाराष्ट्र मोटार वाहनांचे अधिग्रहण व नियंत्रण अधिनियम, १९६५

७) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ.

**<u>बंदरे</u>**

१) रेल्वे व संलग्न बाबी (नवीन रेल्वे प्रकल्प व रेल्वे स्थानकांची नावे यांसह परंतु रेल्वे वरील /खालील पूल वगळून)

२) भारतीय संविधानाच्या सातव्या अनुसूचीतील सूची एक मध्ये विनिर्दिष्ट न केलेली तर उताराची व दळणवळणाची अन्य साधने, अशा रेल्वेच्या बाबतीत सूची एक च्या तरतूदींस अधीन राहून लहान रेल्वे, अशा जल मार्गाच्या संबंधात भारतीय संविधानाच्या सातव्या अनुसूचीमधील सूची एक व सूची तीनच्या अधीन राहून त्यावरील देशांतर्गत जलमार्ग व वाहतूक.

३) मोठ्या बंदरांशी संबंधित असणाऱ्या बाबी.

४) संसदेने केलेल्या किंवा अस्तित्वात असणाऱ्या कायद्याद्वारे किंवा त्याअन्वये मोठी बंदरे म्हणून घोषित केलेल्या बंदराखेरीज इतर बंदरे.

५) प्रकाश नौका, संकेतदीप आणि नौका व विभागाने यांच्या सुरक्षिततेकरिता अन्य तरतुदी यांसह दिपगृहे.

६) देशांतर्गत जल मार्गाने वाहतूक केलेल्या उतारुंवरील व मालावरील शुल्क.

७) यंत्रचलित जलयनासंबंधी देशांतर्गत जलमार्गामधील नौपरिवहन व नौकायन आणि अशा जलमार्गावरील पथनियम व राष्ट्रीय जलमार्गाच्या बाबतीत, भारतीय संविधानाच्या सातव्या अनुसूचीमधील सूचीच्या तरतुदींस अधीन राहून, देशांतर्गत जल मार्गावरुन उतारुंची व मालाची वाहतूक करणे.

८) भरती-आहोटीच्या पाण्यावरील नौपरिवहन व नौकायन यांसह सागरी नौपरिवहन व नौकायन, व्यापारी नाविकांचे शिक्षण व प्रशिक्षण यांच्या तरतुदी आणि राज्याअंतर्गत जल बाष्प जलयाने अधिनियमाद्वारे तरतूद केलेल्या अशा शिक्षण व प्रशिक्षणाचे नियमन.

## ***<u>विभागातील श्रेणीनिहाय कार्यरत अधिकाऱ्यांची रचना</u>***

मा.मंत्री (गृह) व मा.राज्यमंत्री, गृह (शहरे), मा.राज्यमंत्री, गृह (ग्रामीण) हे गृह विभागाचे पोलीस विभागाकरिता प्रमुख असून अप्पर मुख्य सचिव (गृह) हे प्रशासकीय प्रमुख आहेत. अपर मुख्य सचिव (गृह) यांना त्यांच्या कामात उच्चपातळीवर मदत करण्यासाठी तसेच त्यांच्याकडील काही कार्यभार

विभागून घेण्यासाठी प्रधान सचिव (विशेष) हे पोलीस विभागातील भा.पो.से.मधील अधिकाऱ्याचे पद निर्माण करण्यात आले आहे. तसेच प्रधान सचिव (अपील व सुरक्षा) असे एक पद पोलीस व तुरुंग विभागाकरिता निर्माण करण्यात आलेले आहे.

त्याचप्रमाणे राज्य उत्पादन शुल्क, परिवहन व बंदरे विभागाकरिता स्वतंत्र मंत्री असून सचिव (परिवहन, राज्य उत्पादन शुल्क व बंदरे) हे एक भा.प्र.से.मधील अधिकाऱ्याचे पद कार्यरत आहे.

## ***<u>गृह विभागातील सचिव निहाय कामाचे वाटप</u>***

**<u>अपर मुख्य सचिव (गृह):-</u>**

१) भारतीय पोलीस सेवेतील अधिकारी व राज्य पोलीस सेवेतील वर्ग-१ च्या अधिकाऱ्यांच्या आस्थापनाविषयक बाबी.

२) लाचलुचपत केंद्राची आस्थापना.

३) पोलीस उप अधिक्षक व त्यावरील श्रेणीतील पोलीस अधिकाऱ्यांविरुध्द तक्रारी व विभागीय चौकश्या, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १९७ अन्वये व बॉम्बे पोलीस ॲक्ट १६१ अन्वये खटला भरण्यास मंजूरी देणे. प्रिव्हेशन ऑफ करप्शन ॲक्ट अन्वये प्राप्त होणाऱ्या सर्व तक्रारी व खटला भरण्यास, मालमत्ता गोठविण्यास मंजूरी देणे.

४) लोकप्रतिनिधी विरुध्द एसीबी चौकशी व त्याबाबतच्या तक्रारी.

५) मुख्यमंत्री निधीतून मा.मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे देणग्या देणे, सायबर, रेसकोर्स.

६) पोलीस विभागाकरिता लागणारी सर्व खरेदी, पोलीस दलांचे आधुनिकिकरण.

७) महात्मागांधी तंटामुक्त गाव मोहिम.

८) गृह विभागाच्या अर्थसंकल्पविषयक बाबी.

९) राष्ट्रीय सुरक्षा कायदा, १९८० अंतर्गत प्रतिबंधक स्थानबध्दता.

१०) महाराष्ट्र झोपडपट्टी दादा, हातभट्टीवाले व मादक द्रव्ये विषयक गुन्हेगार यांच्या घातक कृत्यांना आळा घालण्याबाबत ५५/१९९२ च्या अधीन नियमांतर्गत स्थानबध्दता.

११) काळ्याबाजारास प्रतिबंध व जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा कायम राखण्याबाबतचा अधिनियम १९८० अंतर्गत स्थानबध्दता.

१२) बेकायदा शस्त्र अधिनियमांतर्गत प्रतिबंधात्मक स्थानबध्दता

१३) सल्लागार मंडळ.

१४) राजकीय गुप्तावार्ता, राजकीय पक्षांच्या हालचाली, तक्रारी, अतिरेक्यांच्या चळवळी.

१५) अंतर्गत सुरक्षा योजना, कोस्टल सिक्युरीटी स्कीम, परदेशी नागरिक व अतिरेकी (थेट टू नॅशनल सिक्युरीटी ओनली) क्रायसीस मॅनेजमेंट व डिझास्टर मॅनेजमेंट (संरक्षणासंदर्भात).

**प्रधान सचिव (अपील व सुरक्षा):-**

१) पोलीस विभागातील पोलीस निरीक्षक पदापर्यंतच्या आस्थापनाविषयक बाबी.

२) सरकारी अभियोग संचालनालयाची आस्थापना.

३) सरकारी अभियोग संचालनालयाच्या आस्थापनेवर कार्यरत सरकारी अभियोक्ता यांची आस्थापना व्यतिरिक्त.

४) विशेष सरकारी अभियोक्ता यांची फौजदारी प्रकरणांत नियुक्ती व फी.

५) पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द दाखल झालेल्या फौजदारी प्रकरणी विधीविषयक कामकाज चालविण्याचे नियम, १९८४ मधील नियम १०९ अनुसार विधी सहाय्य मंजूर करणे, इत्यादी.

६) परकीय चलन संचय आणि तस्करी कार्यास प्रतिबंधक अधिनियम १९७४ अंतर्गत स्थानबध्दता, अंमली पदार्थ व मनावर परिणाम करणाऱ्या पदार्थाच्या अनुचित व्यापारास प्रतिबंध.

७) नारकोटीक ड्रग ॲण्ड सायकोट्रॅफिक ॲक्ट, १९८५ खालील सर्व बाबी व सायबर क्राईम.

८) हॉटेल्स परवान्याबाबतची सर्व प्रकरणे व अपिले, चित्रपटांना परवाना देणे, करमणूक व मनोरंजनावर नियंत्रण ठेवणे व महाराष्ट्र चित्रपट अधिनियम, १९५३ या खालील अपिले व तरती हॉटेल संबंधातील प्रकरणे.

९) हद्दपारीची अपिले व सुनावणी.

१०) लाऊडस्पिकर वापरण्याची वेळ वाढवून देणे.

११) सिनेमा बांधकामास ना-हरकत परवाना देणेबाबत, व्हीडीओ नियमावली बाबतची प्रकरणे.

१२) मुंबई लॉटरी आणि बक्षीस स्पर्धा अधिनियम १९५८, बक्षीस स्पर्धा अधिनियम, १९५५.

१३) पैज लावणे व जुगार, महाराष्ट्र कॅसिनो अधिनियम, १९७६.

१४) विधीमंडळ कामकाजाचे समन्वय

१५) हरीजन व गिरीजन आदिवासी यांच्यावर होणारे अत्याचार.

१६) महिलांवरील अत्याचार, बाल गुन्हेगारी, बलात्कार, बाल विवाह प्रतिबंधक कायदा.

१७) पोलीस विभागातील पोलीस अधिक्षक दर्जापर्यंतच्या अधिकारी/कर्मचारी यांची अनुकंपा निवृत्तीवेतन, इजा निवृत्तीवेतन संबंधित तक्रारी व निवृत्तीवेतनाची प्रकरणे.

१८) गृह विभाग (खुद्द) च्या कर्मचाऱ्यांना घरबांधणी, मोटार वाहन, सायकल व संगणक अग्रिम मंजूर करणे.

१९) पोलीस विभागातील भविष्य निर्वाह निधी व भविष्य निर्वाह निधीची संलग्न ठेव योजना व त्यासंबंधी तक्रारी, गट विमा योजना, १९८२ बाबतची प्रकरणे.

२०) गृह विभागाच्या संदर्भातील माहिती एकत्रित करुन पाठविणे, मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयातून गृह विभागात प्राप्त झालेल्या संदर्भाबाबत पाठपुरावा करणे.

२१) गृह विभाग (खुद्द) च्या सर्व आस्थापनाविषयक बाबी व रोख्र शाख्रा.

२२) गृह विभागात लेख्रन सामग्री, फर्निचर वैगरे पुरविणे, नोंदणी शाख्रा व हाऊसकिंपींग.

२३) पोलीस निरीक्षकापर्यंतच्या अधिकाऱ्यांच्या विरुध्दच्या विभागीय चौकशीच्या अनुषंगाने शासनाकडे येणारी अपीले, निलंबन व विभागीय चौकशीला मुदतवाढ देणे.

२४) कारागृह विभागाच्या आस्थापना व प्रशासन विषयक सर्व बाबी.

२५) नवीन कारागृह बांधणे, कारागृहातील कर्मचाऱ्यांची निवासस्थाने, कारागृह विभागास वस्तुंचा पुरवठा,

२६) तुरुंगातील कैदी, १४ वर्षीय अहवाल/पॅरोल/फरलो, शिक्षेमध्ये कपात, फाशीची शिक्षा, कैद्यांची बदली व मुदतपूर्व सुटका, वेडे कैदी, कुष्ठरोगी कैदी, इत्यादी.

२७) कैद्यांना नियमानुसार आवश्यक सोयी सुविधा देणे.

**<u>प्रधान सचिव (विशेष):-</u>**

१) पोलीस ठाणी व पोलीस चौक्या यांची स्थापना व त्यांचे मनुष्यबळ वाढविणे, पोलीस दलातील (राज्य राख्रीव पोलीस दल व रेल्वे सहीत) पदनिर्मिती, मुदतवाढ.

२) पोलीस महासंचालकांच्या परिषदा,

३) रेल्वे पोलीस दलात वाढ, स्त्री पोलीस दलात वाढ व पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील फेरफार

४) पोलीस कर्मचारी वर्गासाठी घर बांधणी, पोलीस गृह निर्माण व कल्याण महामंडळाच्या सर्व कामासाठी आर्थिक तरतूद.

५) फौजदारी प्रक्रिया संहिता, भारतीय दंड विधान संहिता व एव्हिडन्स ॲक्ट यामधील सुधारणा

६) फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १४४ अन्वये शक्ती प्रदान करणे.

७) राज्य राखीव पोलीस दल नियम व अधिनियम सुधारणा,

८) मुंबई पोलीस अधिनियम १९५१ व मुंबई पोलीस मॅन्युअल, रेल्वे सुरक्षा बल अधिनियम, १९५७ यात सुधारणा, अन्य विभागाशी संबंधित असलेल्या कायद्यातील सुधारणा.

९) महाराष्ट्र ग्राम पोलीस पाटील अधिनियमाखालील सर्व बाबी.

१०) राज्यातील वाहतुकीची सर्व प्रकरणे, पोलीस विभागाच्या वाहनामुळे झालेल्या अपघात प्रकरणी नुकसान भरपाईचे अर्ज.

११) वाहतूक पोलीसांची पदे निर्माण करणे.

१२) कटक मंडळाच्या अधिकारितेखालील क्षेत्रातील कोंडवाडे, भिक्षा प्रतिबंधक कायद्यान्वये पोलीसांनी केलेली कार्यवाही व प्रतिबंधात्मक कारवाई -भटकी गुरे, फेरीवाले भिकारी इत्यादी.

१३) नैसर्गिक आपत्ती व डिझास्टर मॅनेजमेंट प्लान.

१४) शस्त्रे, दारुगोळा हत्यारे व दारुगोळा, विस्फोटक पदार्थ, स्फोटक अधिनियम व नियम

१५) पेट्रोलीयम अधिनियम १९५४ कार्बाइड व कॅल्शियम नियम वा अन्वये पेट्रोलीयम व अन्य ज्वालाग्राही पदार्थांचे नियंत्रण, परिवहन, साठवण, निर्मिती, परिष्करण आणि संमिश्रण करणे.

१६) बॉम्बस्फोट.

१७) सिव्हील प्रोसीजर कोड मधील कलम ८० अन्वये नोटीस हाताळणे. खटल्यासंबंधी बाबी.

१८) खून/खूनाचा प्रयत्न/प्राणघातक हल्ला/संशायस्पद मृत्यू/अपमृत्यू

१९) भारतीय दंड विधान संहिता व अन्य सर्व फौजदारी गुन्ह्यांची न्यायालयीन प्रकरणे तसेच इतर कायद्यांखालील पोलीसांकडे नोंदविलेले गुन्हे.

२०) पोलीस चकमक, एक्स्लुमेशन (मृतदेह उकरुन बाहेर काढणे), मृत व्यक्तींची मालमत्ता,

२१) अवैध धंदे यावरील आलेल्या तक्रारी व याबाबतची पोलीस कारवाई.

२२) आर्थिक फसवणूक व अफरातफरीबाबतच्या प्रकरणांची चौकशी.

२३) सहकारी व खाजगी संस्था, कंपन्या, वाणिज्य संस्था व खाजगी व्यक्ती यांच्या कारभाराबाबत पोलीस चौकशी प्रकरणे.

२४) जबरी चोऱ्या, दरोडे, जुलमाने घेणे, रेल्वे बंदरे यांच्या परिसरात होणाऱ्या चोऱ्यांची चौकशी.

२५) महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थामधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९

२६) संगणकीकृत मुद्रांक शुल्क प्रशासनिक पध्दत.

२७) गुन्ह्यांची आकडेवारी, पळवलेल्या/हरवलेल्या व्यक्तींची प्रकरणे (यात खूनासह)

२८) वरिष्ठ पोलीस निरीक्षकापर्यंतच्या अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्दच्या तक्रारी.

२९) फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम १९९७ व मुंबई पोलीस अधिनियम, कलम १६१ अन्वये पोलीस निरीक्षक व त्या खालच्या दर्जाच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द खटला भरण्यास मान्यता.

३०) पोलीस कोठडीतील मृत्यू.

३१) मानवी हक्क आयोग.

३२) राजद्रोहात्मक सभा अधिनियम व १९०८ चा फौजदारी कायदा सुधारणा यासह राज्यविरुध्दचे सर्व अपराध.

३३) राजकीय गुप्तवार्ता व राजकीय व जातीय आंदोलने व विघातक हालचाली आणि त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय.

३४) शासनाकडून पाठविले जाणारे नियतकालीक अहवाल.

३५) राजकीय पक्षांच्या हालचाली/तक्रारी.

३६) लोकप्रतिनिधी विरुध्दच्या सर्व तक्रारी, कायदा व सुव्यवस्थेशी संबंधीत गुन्हे.

३७) मोर्चा, घेराव, निदर्शने उपोषण, आत्मदहन.

३८) जातीय दंगली वगळून सर्व प्रकारच्या दंगली.

३९) राज्य राखीव दलाच्या प्रतिनियुक्तीचा खर्च वसूल करणे व कामगार चळवळ /तंटे व त्यासंबंधात पोलीस संरक्षण.

४०) हिंदू-मुस्लिम यांचे सबंधातून निर्माण होणारे तणाव/तक्रारबाबतचे अर्ज, जातीय दंगली व जातीय भावना दुखविणारी प्रक्षोभक भाषणे व लिखाण.

४१) अतिरेकी आणि विध्वसंक कृत्य विरोधी कायदे व त्याबाबतची कार्यवाही.

४२) जातीय सलोखा, राष्ट्रीय एकात्मतेबाबत सामान्य प्रशासन विभागाकडून मागविण्यात येणारी माहिती, धार्मिक मिरवणूकींसाठी विशेष परवानगी.

४३) टाडा, मोक्का व पोटा ॲक्ट खालील सर्व प्रकरणे व नक्षली कारवाई व नक्षलीविरुध्द कारवाई आणि त्या अनुषंगाने येणाऱ्या सर्व बाबी.

४४) न्यायालयीन चौकश्या/पोलीस गोळीबारासह सर्व दंडाधिकारी चौकशीची प्रकरणे.

४५) गोळीबार व दंगलीच्या चौकशीसाठी शासनाने नेमलेल्या आयोगाची सर्व प्रकरणे.

४६) अंतर्गत सुरक्षा योजना व शासकीय गुपिते अधिनियम, १९२३.

४७) पूर्व चारित्र्य व चारित्र्य यांची पडताळणी.

४८) भारताची अंतर्गत सुरक्षा व संरक्षण व सैन्याची सेवा प्रवेश व वाहतूक.

४९) पोलीस गार्डस् व पोलीस संरक्षण व अतिमहत्वाच्या व्यक्तिंचे राज्यातील प्रवास दौरे.

५०) परमिशन अन्डर फॉरेन कॉन्ट्रीब्युशन ॲक्ट, डेथ कॉम्पन्सेशन टू इंडियन नॅशनल लिव्हिंग ॲब्रोड.

५१) बोधचिन्हे व नांवे (अनुचित वापरास प्रतिबंध) अधिनियम, १९५०.

५२) विदेशी नागरिकांना भारतातील अधिवास परवाना/अधिवास परवान्याला (व्हिसा) मुदतवाढ देणे व तद्‍नुषंगिक इतर बाबी.

५३) विदेशी कलाकारांना भारतात कार्यक्रम करण्यासाठी परवानगी देणे.

५४) परकीय देशांबरोबर परराष्ट्र व्यवहार, तह व करार करणे आणि परकीय देशांतील कैद्यांच्या प्रत्यार्पणासह झालेले तह करार व अभिसंधीची अंमलबजावणी करणे.

५५) वैध व्हिसा घेऊन येणाऱ्या पाकिस्तानी व बांगलादेशी नागरिकांबाबत

५६) भारतीय नागरिकत्व, पाकिस्तानात होणाऱ्या शीख यात्रा.

५७) दस्ताऐवजांचे साक्षांकन, पारपत्र व प्रवेशपत्र व भारतीय नागरीक पारपत्रे.

५८) नागरी संरक्षण, गृहरक्षक, ग्रामीण संरक्षण पथके व त्यासंबंधीत आस्थापना विषयक सर्व बाबी.

**<u>सचिव (परिवहन, बंदरे व रा.ऊ.शु.):-</u>**

**<u>परिवहन:-</u>**

१) यंत्रचलित वाहने यासह वाहन, मोटार वाहने व सार्वजनिक वाहने (सरकारी कोट्यातून देण्यात आलेल्या मोटार गाड्या, स्कूटर व इतर यंत्रचलित वाहने यांच्या बाबी वगळून) मार्ग परिवहन सेवा.

२) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

३) मोटार वाहने (वितरण व विक्री) नियंत्रण आदेश, १९५०, स्कूटर (वितरण व विक्री) नियंत्रण आदेश, १९६० व ट्रॅक्टर्स (वितरण व विक्री) नियंत्रण आदेश, १९७१.

४) महाराष्ट्र मोटार वाहनांचे अधिग्रहण (आणि नियंत्रण) अधिनियम, १९६५

५) मालवाहनातून माणसांची वाहतूक.

६) मोटार वाहन नियमातून सूट.

७) नॅशनल परमिट , टूरिस्ट व्हेईकल परमिट.

८) टॅक्सी व ऑटो रिक्षा परमिट बाबत.

९) ट्रान्सपोर्ट डेव्हलपमेंट कॉन्सिलच्या मिटींग.

१०) ड्रायव्हर/ कंडक्टरसाठी बॅचेस व युनिफॉर्मस्, मोटर ट्रेनिंग स्कूल.

१२) शासकीय कामासाठी अगर आपत्तीच्या वेळी खाजगी वाहने ताब्यात घेणे.

१३) शासकीय वाहनावर लाल दिवे लावण्यास परवानगी देणे.

१४) मोटार वाहन नियम कायद्यात सुधारणा.

१५) मुंबई मोटार वाहन कर व भाषांवरील कर प्रकरणांतील लेखा आक्षेप.

१६) रस्त्यांवर चालण्यासाठी योग्य असलेल्या वाहनांवरील कर मग ती वाहने यंत्रचलित असोत किंवा नसोत.

१७) रस्त्यावरुन नेण्यात येणारा माल व प्रवासी यांच्यावरील कर, आंतरराज्यीय वाहतूक करार इत्यादी.

१६) परिवहन विभागांतर्गत मोटार वाहन विभागांतील वर्ग-४ चे कर्मचारी ते मोटार वाहन निरीक्षक (वर्ग-१) यांच्या आस्थापना विषयक सर्व बाबी.

१७) मोटार वाहन विभागाच्या प्रशासकीय व आस्थापना या संबंधीच्या बाबी.

१८) रेल्वे व त्यांच्याशी संलग्न असलेल्या बाबी (रेल्वे व पूल/ भुयारीमार्ग याखेरीज) नवीन रेल्वे मार्ग बांधणेबाबत, रेल्वेचा विस्तार व प्राथम्य अहवाल तयार करण्याबाबत.

१९) भारताच्या संविधानाच्या ७ व्या अनुसूचीतील सूची १ मध्ये निर्दिष्ट करण्यात न आलेली दळणवळणाची इतर साधने, लहान रेल्वेमार्गासंबंधातील सूची १ मधील तरतुदींच्या अधीन असलेले असे लहान रेल्वेमार्ग.

२०) नॅरोगेज रेल्वे मार्गाचे ब्रॉडगेजमध्ये रुपांतर करणेबाबत.

२१) लेव्हलक्रासिंग ओव्हर ब्रिज बांधणे.

२२) रेल्वे वाहतुकीसंबंधी बाबी.

२३) शासन रेल्वेचा विस्तार व प्राथम्य अहवाल, कोंकण रेल्वेसाठी जमीन संपादन करणे.

२४) मोटार अपघात दावा न्यायाधिकरणे यांच्या प्रशासन व आस्थापना विषयक बाबी.

२५) परिवहन उप विभागातील कोणत्याही कार्यासनाकडे न सोपविलेले विषय.

**बंदरे:-**

१) किनारा धूप प्रतिबंधक कार्य, लहान बंदरांचा विकास, भगवती बंदर, रत्नागिरी, दाभोळ, रामपूरी खाड्या इ.

२) कोंकण किनाऱ्यावरील प्रवासी बोट वाहतूक, लहान बंदरांच्या पाणीपुरवठा योजना, कॅटींग, रिफ्रेशमेंट रुम इ.

३) पाण्याची व्यवस्था, विद्युतीकरण, बंदरातील जोडणारे रस्ते, सर्व खाडीतील अंतर्गत जल वाहतूक

४) फेरीज, लहान बंदरांचा हायड्रोग्राफिक सर्व्हे, जेटी बांधणे इ.

५) वेटींग शेड हॉल, सॅनिटरी व्यवस्था ई.

६) संबंधित विषयावरील विधानसभा/ परिषद प्रश्न इत्यादी.

७) यंत्रावर चालणाऱ्या जहाजांच्या संबंधात देशांतर्गत जलमार्गावरील नौवहन आणि नौपरिवहन आणि राष्ट्रीय जलमार्गाच्या संबंधातील भारतीय संविधानाच्या अनुसूचीतील सूची १ मधील तरतुदीच्या अधीनतेने अशा जलमार्गावरील मार्गाचे नियम, देशांतर्गत जलमार्गावरील प्रवासी व माल यांची वाहतूक.

८) संसदेने केलेल्या कायद्याखाली किंवा सध्या अस्तित्वात असलेल्या कायद्याखाली किंवा त्याअन्वये प्रमुख बंदरे असल्याचे घोषित करण्यात आले असतील त्याखेरीजची बंदरे

९) अर्थसंकल्प विषयक बाबी.

१०) प्रमुख बंदरांशी संबंधीत असलेल्या बाबी, नौवहन व विमान यांच्या सुरक्षिततेसाठी दिपगृहे यासह प्रकाश नौका, संकेतदीप व इतर तरतुदी.

११) इंडियन पोर्ट ॲक्ट, १९०८ (सर्वसाधारण बाबी), लँन्डिग ॲक्ट, व्हाईजफ्रीज ॲक्ट, १९८२ (सर्वसाधारण बाबी).

१२) मर्चंटस् शिपिंग ॲक्ट, १९८५ (सर्वसाधारण बाबी), नॅशनल हार्बर बोर्ड.

१३) अंतर्देशीय जलमार्गावर वाहतूक केलेल्या प्रवाशांची व मालाची येणे असलेली रक्कम.

१४) बंदर विभागातील कर्मचाऱ्यांच्या आस्थापना, बंदरावरील कार्यालये व निवासस्थाने इ.

१५) अंतर्गत स्टीम व्हेसल ॲक्ट, १९१७, लाईट हाऊसेस ॲक्ट, १९१८ ई.

<u>राज्य उत्पादन शुल्क:-</u>

१) अफूसंबंधातील भारतीय संविधानाच्या ७व्या अनुसूचीतील सूची १ मधील नोंद क्र.५९ च्या अधीन येणा-या बाबी म्हणजेच नशा आणणारे मद्य, औषधीद्रव्ये(धोकादायक औषधीद्रव्यांसह आणि विषारी पदार्थ यांचे उत्पादन करणे, निर्मिती करणे, जवळ बाळगणे, वाहतूक करणे, खरेदी व विक्री करणे, दारुबंदी प्रचार व दारुबंदी शिक्षण वगळता नशा आणणा-या मद्यांच्या वापरावर बंदी आणि उपभोगाच्या हेतूने वापरल्या जाणा-या औषधी द्रव्यांवर बंदी घालणे. प्रोहिबिशन पॉलिसी

२) काकवीचे नियंत्रण व वाटप करणे व बॉम्बे डिनेचर्ड स्पिरीट रुल्स,१९५९.

३) महाराष्ट्र डिनेचर्ड स्पिरीटयुक्त प्रिपरेशन रुल्स १९६३,

४) स्पिरीटच्युअर्स प्रिपरेशन (इंटर स्टेट टफेड ॲन्ड कॉमर्स) कंट्रोल ॲक्ट १९५५ आणि

रुल्स १९५७,

५) मेडीकल ॲन्ड टॉयलेट प्रिपरेशन ( एक्साईज डयुटी) ॲक्ट १९५५, ॲन्ड रुल्स १९५६,

६) मुंबई विदेशी मद्य नियम १९५३ व विशेष परवाने आणि अनुज्ञप्ती नियम,१९५२.

७) महाराष्ट्र विदेशी मद्य ( स्टिअरेज इर वॉड ) नियम १९६४,

८) महाराष्ट्र विदेशी मद्य (आयात व निर्यात ) नियम १९५३,

९) महाराष्ट्र डिस्टीलेशन ऑफ स्पिरीट ॲन्ड मॅन्युफक्चर ऑफ पोटेबल लिकर रुल्स,१९६६,

१०) महाराष्ट्र मॅन्युफक्चर ऑफ बिअर ॲन्ड वाईन रुल्स, १९६६,

११) बॉम्बे फॉरेन लिकर ॲन्ड रेक्टीफाईड (ट्रान्सपोर्ट) फीज रुल्स,१९५६,

१२) बॉम्बे रेक्टीफाईड स्पिरीट रुल्स, १९५१,

१३) बॉम्बे मौलेसिस रुल्स,१९५५

१४) बॉम्बे प्रोहिबिशन (प्रीव्हीलेजेस फीज) रुल्स,१९५४,

१५) अवैध विदेशी दारुसंबंधीची प्रकरणे

१६) विदेशी दारुशी संबंधीत सर्व प्रकरणे.

१७) महाराष्ट्र डिस्टीलेशन ऑफ स्पिरीट ॲन्ड मॅन्युफक्चर ऑफ पोटेबल लिकर रुल्स,१९६६,

१८) महाराष्ट्र मॅन्युफक्चर ऑफ बिअर ॲन्ड वाईन रुल्स, १९६६,

१९) महाराष्ट्र कंट्री लिकर रुल्स,१९७३,

२०) दारुबंदी व उत्पादन शुल्क विभाग महाराष्ट्र राज्य या विभागाशी संबंधीत आस्थापना प्रकरणे, विभागीय चौकशी संबंधीची प्रकरणे व दारुबंदी प्रचार कार्याबाबतची प्रकरणे.

## विभागातील कामकाजाचे खालील प्रमाणे सह सचिव/उप सचिव व अवर सचिव /कक्ष अधिकाऱ्यांमध्ये वाटप करण्यात आले आहे

| अ. क्र. | विषय | सह सचिव/उप सचिव | अवर सचिव/कक्ष अधिकारी |
|---|---|---|---|
| | **पोलीस** | | |
| १ | आयपीएस वर्ग - १ च्या ( पोल-२ व भापोसे कक्षाकडील बाबी सोडून) आस्थापनाविषयक बाबी | सह/उप सचिव, कार्यासन पोल-१, ७ वा मजला दू.क्र.२२०२५४६३ विस्तार-३८९१ | कक्ष अधिकारी/अवर सचिव, कार्यासन पोल- १, ७ वा मजला (मुख्य), मंत्रालय, मुंबई-३२ दू.क्र.२२०२५४६३ |
| २ | राज्य पोलीस सेवेतील (भापोसे अधिकारी वगळून) वर्ग-१ च्या अधिकाऱ्यांच्या आस्थापनाविषयक बाबी. | सह/उप सचिव, कार्यासन पोल-१अ, ७ वा मजला, दू.क्र.२२०२५४६३ विस्तार-३८९१ | कक्ष अधिकारी/अवर सचिव, कार्यासन पोल- १अ, ७ वा मजला (मुख्य), मंत्रालय, मुंबई-३२ दू.क्र.२२०२५४६३ |
| ३ | भारतीय पोलीस सेवेमधील अधिकाऱ्यांच्या सेवाअभिलेख विषयक बाबी. | सह/उप सचिव, भापोसे कक्ष, ७ वा मजला, दू.क्र.२२०२५१३२ विस्तार-३८९१ | लेखाधिकारी, कार्यासन भापोसे कक्ष, ७ वा मजला (मुख्य), मंत्रालय, मुंबई-३२ दू.क्र.२२०२४९६४ |
| ४ | पोलीस उप अधीक्षक व त्यावरील श्रेणीतील पोलीस अधिकाऱ्यां- विरुध्दच्या तक्रारी /विभागीय कारवाई, लोकप्रतिनिधींविरुध्द एसीबी चौकशी इत्यादी | सह/उप सचिव, कार्यासन पोल-२, ७ वा मजला, दू.क्र.२२०२५१३२ विस्तार-३८९१ | कक्ष अधिकारी/अवर सचिव, कार्यासन पोल- २, ७ वा मजला (मुख्य), मंत्रालय, मुंबई-३२ दू.क्र.२२०२५९७९ |
| ५ | पोलीस ठाणी, पोलीस चौक्या स्थापणे, पदनिर्मिती, पदांना मुदतवाढ, इत्यादी. | सह/उप सचिव कार्यासन पोल-३ ५ वा मजला, दू.क्र.२२०२३९३३ विस्तार-३८१९ | कक्ष अधिकारी/अवर सचिव, कार्यासन पोल- ३, ७ वा मजला (मुख्य), मंत्रालय, मुंबई-३२ दू.क्र.२२०२८६९ |
| ६ | पोलीस दलाचे आधुनिकीकरण, अपमृत्यू निर्णेता, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेच्या आस्थापनाविषयक बाबी इत्यादी. | सह/उप सचिव, कार्यासन पोल-४, ७ वा मजला दू.क्र.२२०४९४६४ विस्तार-३७३१ | कक्ष अधिकारी/अवर सचिव, कार्यासन पोल- ४ ७ वा मजला (मुख्य), मंत्रालय(मुख्य), मुंबई-३२ दू.क्र.२२०२५४५७ |
| ७ | पोलीस उप निरीक्षक, पोलीस शिपाई सेवा भरती, वेतन व भत्ते, पोलीस प्रशिक्षण, राज्य राखीव पोलीस दल आस्थापना, | सह/उप सचिव, कार्यासन पोल-५अ, ७ वा मजला | कक्ष अधिकारी/अवर सचिव, कार्यासन पोल- ५ अ, |

| | | | |
|---|---|---|---|
| | पोलीस तपासपथकास विदेश दौऱ्यास मंजूरी, इत्यादी. | दू.क्र.२२०२३१८४<br>विस्तार-३६५६ | ७ वा मजला (मुख्य), मंत्रालय मुंबई-३२<br>दू.क्र२२०२२७८५ |
| ८ | गृह विभागाच्या अधिपत्याखालील पोलीस निरीक्षक दर्जा पर्यंतची आस्थापना(पदोन्नती, बदल्या, मानीव दिनांक, सेवाज्येष्ठता, इ.), अफरातफरीची प्रकरणे, अनुकंपा कारणास्तव पोलीस खात्यात नोकरी देणेबाबत इ. | सह/उप सचिव,<br>कार्यासन पोल-५ब,<br>७ वा मजला<br>दू.क्र.२२०२३१८४<br>विस्तार-३६५६ | कक्ष अधिकारी/अवर सचिव,<br>कार्यासन पोल- ५ ब<br>७ वा मजला (मुख्य),<br>मंत्रालय, मुंबई-३२<br>दू.क्र.२२०२२८६९ |
| ९ | कोकण परिक्षेत्र (फक्त ठाणे जिल्हा) नांदेड, औरंगाबाद, अमरावती, नागपूर परिक्षेत्रातील पोलीस निरीक्षकापर्यतच्या अधिकारी व कर्मचारी यांच्या विरुध्दच्या विभागीय कार्यवाहीसंबंधिची अपीले, निलंबन, विभागीय चौकशीच्या मुदतवाढीचे प्रस्ताव, सरकारी अभियोग संचालनालयाचे अहवालाच्या अनुषंगाने पोलीस अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई | सह/उप सचिव,<br>कार्यासन पोल-६अ,<br>५ वा मजला<br>दा.क्र.५५८(वि.)<br>दू.क्र.२२०४८१३०<br>विस्तार-३८९४ | कक्ष अधिकारी/अवर सचिव,<br>कार्यासन पोल-६ अ<br>७ वा मजला (मुख्य),<br>मंत्रालय, मुंबई-३२<br>दू.क्र.२२०२२८६९ |
| १० | कोकण परिक्षेत्र (ठाणे जिल्हा वगळून) कोल्हापूर, नाशिक परिक्षेत्र, मुंबई शहर, मुंबई व पुणे रेल्वे येथील पोलीस निरीक्षकापर्यंतच्या विभागीय कार्यवाहीसंबंधिची अपीले, निलंबन, विभागीय चौकशीच्या मुदतवाढीचे प्रस्ताव, सरकारी अभियोग संचालनालयाचे अहवालाच्या अनुषंगाने पोलीस अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई | सह/उप सचिव,<br>कार्यासन पोल-६ब,<br>५ वा मजला,<br>दा.क्र.५५८(वि.)<br>दू.क्र.२२०४८१३०<br>विस्तार-३८९४ | कक्ष अधिकारी/अवर सचिव,<br>कार्यासन पोल-६ ब<br>७ वा मजला (मुख्य),<br>मंत्रालय, मुंबई-३२<br>दू.क्र.२२०२२८६९<br>विस्तार-३८१९ |
| ११ | पोलीस गृह निर्माण, पोलीस कर्मचाऱ्यांना निवासस्थानांचे वाटप, मुदतवाढ, विद्युतीकरण, पोलीस कल्याणाच्या बाबी. | सह/उप सचिव<br>कार्यासन पोल-७<br>७ वा मजला,<br>दू.क्र.२२०२८५४७<br>विस्तार-३५४० | कक्ष अधिकारी/अवर सचिव,<br>कार्यासन पोल-७<br>७ वा मजला (विस्तार),<br>मंत्रालय, मुंबई-३२<br>दू.क्र.२२०२४८४९ |
| १२ | पोलीस पाटील अधिनियम, राज्यातील वाहतुकीची प्रकरणे, महामार्ग सुरक्षा गस्त यासहित महामार्गावरील चोऱ्या, दरोडे इत्यादीसंबंधीची गुन्हयासहित सर्व प्रकरणे, मोटार अपघात दावा न्यायाधिकरणाकडील नुकसान भरपाईचे दावे, भिक्षा प्रतिबंधक | सह/उप सचिव,<br>कार्यासन पोल-८,<br>५ वा मजला<br>दू.क्र.२२०२४८६९<br>विस्तार-३३८२ | कक्ष अधिकारी/अवर सचिव,<br>कार्यासन पोल-८,<br>७ वा मजला (मुख्य), मंत्रालय (मुख्य), मुंबई-३२<br>दू.क्र.२२०२५४५७ |

| | | | |
|---|---|---|---|
| | कायद्यान्वये कार्यवाही, नैसर्गिक आपत्ती व अन्य संकीर्ण बाबी. | | |
| १३ | शस्त्रे, दारुगोळा हत्यारे व दारुगोळा विस्फोटक पदार्थ, स्फोटक अधिनियम व नियम, बॉम्बस्फोट, सिव्हील प्रोसीजर कोड कलम ८० अन्वये दिलेल्या नोटीसा हाताळणे, खटल्यासंबंधी बाबी इत्यादी | सह/उप सचिव,<br>कार्यासन पोल-९,<br>७ वा मजला,<br>दू.क्र.२२०२७०७४<br>विस्तार-३३३५ | कक्ष अधिकारी/अवर सचिव,<br>कार्यासन पोल-९,<br>७ वा मजला (मुख्य), मंत्रालय<br>मुंबई-३२<br>दू.क्र.२२०२५४५७ |
| १४ | पोलीस अभियोग संचालनालय आस्थापना, विधी सहाय्य देणे. इत्यादी बाबी. | सह/उप सचिव,<br>कार्यासन पोल-१०,<br>५ वा मजला<br>दा.क्र.५५८(वि.)<br>दू.क्र.२२०२८५४७<br>विस्तार-३६५७ | कक्ष अधिकारी/अवर सचिव,<br>कार्यासन पोल-१०,<br>७ वा मजला (मुख्य), मंत्रालय<br>(मुख्य), मुंबई-३२<br>दू.क्र.२२०२२८१७ |
| १५ | खुन/ खुनाचा प्रयत्न/ प्राणघातक हल्ला/ संशयास्पद मृत्यू/ अपमृत्यू इत्यादी बाबतची प्रकरणे, भारतीय दंड विधान संहितेखालील तसेच इतर कायद्यांखालील गुन्हे पोलीस चकमक (Encounter), अवैध धंदे, मटका, जुगार अशा एकत्रित स्वरुपाच्या तक्रारी इत्यादी | सह/उप सचिव,<br>कार्यासन पोल-११,<br>५ वा मजला<br>दा.क्र.५५३ (वि.)<br>दू.क्र.२२०२८५४७<br>विस्तार-३५४० | कक्ष अधिकारी/अवर सचिव,<br>कार्यासन पोल-११,<br>७ वा मजला (मुख्य),<br>मंत्रालय, मुंबई-३२ |
| १६ | आर्थिक फसवणुक व अफरातफरीच्या प्रकरणांची चौकशी (खाजगी संस्था/ कंपन्या/सरकारी आस्थापना), जबरी चोऱ्या, दरोडे यांची चौकशी, महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९. | सह/उप सचिव,<br>कार्यासन पोल-१२,<br>दा.क्र.५५३ (वि.)<br>दू.क्र.२२०२५४५९<br>विस्तार-३६५७ | कक्ष अधिकारी/अवर सचिव,<br>कार्यासन पोल-१२,<br>७ वा मजला (मुख्य),<br>मंत्रालय, मुंबई-३२<br>दू.क्र.२२०२८३४० |
| १७ | गुन्हयांची आकडेवारी (विश्लेषणासह) पळवलेल्या/ हरवलेल्या व्यक्तिंची प्रकरणे, फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम -१९७ व मुंबई पोलीस अधिनियम, कलम - १६१ अन्वये पोलीस निरीक्षक व त्या खालच्या दर्जाच्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांविरुध्द खटला भरण्यास मान्यता देण्याबाबतची प्रकरणे. | सह/उप सचिव,<br>कार्यासन पोल-१३,<br>५ वा मजला<br>दा.क्र.५५८ (वि.)<br>दू.क्र.२२०४८१३०<br>विस्तार-३८९४ | कक्ष अधिकारी/अवर सचिव,<br>कार्यासन पोल-१३,<br>७ वा मजला (मुख्य),<br>मंत्रालय, मुंबई-३२<br>दू.क्र.२२०२८३४० |
| १८ | पोलीस कोठडीतील मृत्यू, मानवी हक्क आयोग. | सह/उप सचिव,<br>कार्यासन पोल-१४,<br>५ वा. मजला<br>दा.क्र.५५८ | कक्ष अधिकारी/अवर सचिव,<br>कार्यासन पोल-१४,<br>७ वा मजला (मुख्य),<br>मंत्रालय, मुंबई-३२ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | दू.क्र..२२०२३९३३<br>विस्तार-३३७७ | दू.क्र.२२०२८३४० |
| १९ | महात्मा गांधी तंटामुक्त गांव योजना | सह /उप सचिव<br>७ वा मजला,<br>कार्यासन पोल-१५<br>दू.क्र.२२०४९४६४<br>विस्तार-३७३१ | कक्ष अधिकारी/अवर सचिव,<br>कार्यासन पोल-१५,<br>७ वा मजला (मुख्य),<br>मंत्रालय, मुंबई-३२<br>दू.क्र.२२०२२८६९ |
| २० | कायदा व सार्वजनिक सुव्यवस्था, कायदा व सुव्यवस्थेबाबत येणारे नियतकालीक अहवाल व त्यांची छाननी, शासनाकडून पाठविले जाणारे नियतकालीक अहवाल, राजकीय पक्षांच्या हालचाली, लोकप्रतिनिधींविरुध्दच्या तक्रारी, दंगली (जातीय वगळून), मोर्चा, निदर्शने, उपोषणे, आत्मदहन इत्यादीबाबत कार्यवाही. | सह/उप सचिव,<br>कार्यासन विशा-१अ<br>७ वा मजला<br>दू.क्र.२२०२७०७४<br>विस्तार-३३३५ | कक्ष अधिकारी/अवर सचिव,<br>कार्यासन विशा-१ अ,<br>दा.क्र.७०८<br>७ वा मजला, विस्तार,<br>मंत्रालय, मुंबई-३२<br>दू.क्र.२२०२५४६१ |
| २१ | जातीय भावना दुखविणारी प्रक्षोभक भाषणे व लिखाण याबाबत कार्यवाही, जातीय दंगली, अतिरेकी चळवळी, जातीय सलोखा, महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम (गोहत्या प्रतिबंध), जातीय संघटना, टोळीयुध्द, खंडणी, टाडा, मोक्का व पोटा ॲक्ट खालील सर्व प्रकरणे इत्यादी | सह/उप सचिव,<br>कार्यासन विशा-१ब<br>विस्तार, दा.क्र.७०८<br>दू.क्र.२२०२७०७४<br>विस्तार-३३३५ | कक्ष अधिकारी/अवर सचिव,<br>कार्यासन विशा-१ ब,<br>दा.क्र.७०८<br>७ वा मजला (विस्तार),<br>मंत्रालय, मुंबई-३२<br>दू.क्र.२२०२५४६१ |
| २२ | पोलीस गोळीबाराच्या न्यायालयीन/ दंडाधिकारी चौकशीची प्रकरणे, चौकशी आयोग, खटले काढून घेण्याबाबतचे प्रस्ताव, चॅप्टर केसेस यासंबंधीची कार्यवाही. | सह/उप सचिव<br>कार्यासन विशा-२<br>दा.क्र.५५८ (विस्तार)<br>दू.क्र.२२०२८५४७<br>विस्तार-३५४० | कक्ष अधिकारी/अवर सचिव,<br>कार्यासन विशा-२,<br>७ वा मजला (मुख्य),<br>मंत्रालय, मुंबई-३२<br>दू.क्र.२२०२२८६९ |
| २३ | परकीय चलन संचय आणि तस्करी कार्यास प्रतिबंधक अधिनियम, १९७४ (कॉफेपोसा) अंतर्गत स्थानबध्दता व तत्सम प्रकरणे, नारकोटीक ड्रग ॲण्ड सायकोट्रॉपिक ॲक्ट, १९८५ खालील सर्व बाबी, सायबर क्राईम व तद्अनुषंगिक प्रकरणे. | सह/उप सचिव,<br>कार्यासन विशा-३अ<br>दा.क्र.५४८(मुख्य)<br>दू.क्र.२२८८३३७८<br>विस्तार-३६५६ | कक्ष अधिकारी/अवर सचिव,<br>कार्यासन विशा-३ अ,<br>दा.क्र.५४८<br>५ वा मजला (मुख्य),<br>मंत्रालय, मुंबई-३२<br>दू.क्र.२२०२१५१४ |
| २४ | राष्ट्रीय सुरक्षा कायदा, १९८० अंतर्गत | सह/उप सचिव, | कक्ष अधिकारी/अवर सचिव, |

| | | | |
|---|---|---|---|
| | प्रतिबंधक स्थानबध्दता तसेच महाराष्ट्र झोपडपट्टी दादा, हातभट्टीवाले व मादक द्रव्ये विषयक गुन्हेगार यांची स्थानबध्दता, काळ्या बाजारास प्रतिबंध, बेकायदा शस्त्र अधिनियम अंतर्गत प्रतिबंधात्मक स्थानबध्दता इत्यादी | कार्यासन विशा-३ब<br>दा.क्र.५४८(मुख्य)<br>दू.क्र.२२८८३३७८<br>विस्तार-३६५६ | कार्यासन विशा-३ ब,<br>दा.क्र.५३३ (मुख्य),<br>५ वा मजला मंत्रालय,<br>मुंबई-३२<br>दू.क्र.२२८४५१८० |
| २५ | अंतर्गत सुरक्षा, शासकीय गुपिते अधिनियम, १९२३ प्रतिषिध्द क्षेत्र घोषित करणे, महत्वाच्या/ अतिमहत्वाच्या व्यक्तींची सुरक्षा व्यवस्था व विमानतळावरील सुरक्षा व्यवस्था, मंत्रालय सुरक्षा, कोस्टल सुरक्षा, पोलीस गार्डस व पोलीस संरक्षण इत्यादीबाबतची प्रकरणे. | सह/उप सचिव,<br>कार्यासन विशा-४<br>दा.क्र.७०८ (विस्तार)<br>दू.क्र.२२०२८६८८<br>विस्तार-३६५६ | कक्ष अधिकारी/अवर सचिव,<br>कार्यासन विशा-४,<br>दा.क्र.५३४ (मुख्य),<br>५ वा मजला, मंत्रालय,<br>मुंबई-३२<br>दू.क्र.२२०२५०५२<br>विस्तार-३६६१ |
| २६ | हॉटेल्स परवाने व अपील, चित्रपट परवाना, महाराष्ट्र चित्रपट(नियम) अधिनियम, १९५३ खालील अपिले, हद्दपारीची अपिले, लाऊडस्पिकर परवाना, मुंबई लॉटरी (नियंत्रण व कर) आणि बक्षिस स्पर्धा( कर आकारणी) इत्यादीबाबतची प्रकरणे. | सह/उप सचिव,<br>कार्यासन विशा- ५,<br>दा.क्र.५४८ (मुख्य),<br>दू.क्र.२२२०२८६८८<br>विस्तार-३६५६ | कक्ष अधिकारी/अवर सचिव,<br>कार्यासन विशा-५,<br>दा.क्र.५३४ (मुख्य),<br>५ वा मजला, मंत्रालय,<br>मुंबई-३२<br>दू.क्र.२२०२५०५२<br>विस्तार-३६६१ |
| २७ | हरिजन व गिरीजन आदिवासी यांच्यावर होणारे अत्याचार, नागरी हक्क संरक्षण अधिनियम, अनुसूचित जाती कल्याण समिती, स्त्रिया व मुली अनैतिक व्यवसाय दमन अधिनियम, महिलांवरील अत्याचार, बाल गुन्हेगारी, बालविवाह प्रतिबंधक कायदा इत्यादी. | सह/उप सचिव,<br>कार्यासन विशा-६<br>दा.क्र.५५८ (मुख्य)<br>दू.क्र.२२०२३९३३<br>विस्तार-३३७७ | कक्ष अधिकारी/अवर सचिव,<br>कार्यासन विशा-६,<br>दा.क्र.७०८,<br>७ वा मजला, (विस्तार),<br>मंत्रालय, मुंबई-३२<br>दू.क्र.२२०२५४६१ |
| २८ | गृह विभागाशी संबंधित विधानमंडळ कामकाजाचे समन्वय, राजशिष्टाचार, विशेष कार्य कक्षाकडील संदर्भांचा पाठपुरावा करणे इ. | सह/उप सचिव<br>कार्यासन विशा-७<br>दा.क्र.५३६ (मुख्य)<br>दू.क्र.२२०२४८६९<br>विस्तार-३३८२ | कक्ष अधिकारी/अवर सचिव,<br>कार्यासन विशा-७,<br>दा.क्र.५३२ (मुख्य),<br>५ वा मजला, मंत्रालय,<br>मुंबई-३२<br>दू.क्र.२२०२६८१५ |
| २९ | नागरी संरक्षण, गृहरक्षक यांच्या आस्थापनाविषयक सर्व बाबी. | सह/उप सचिव,<br>कार्यासन विशा-८,<br>७ वा मजला<br>दू.क्र.२२०२३१८४<br>विस्तार-३६५६ | कक्ष अधिकारी/अवर सचिव,<br>कार्यासन विशा-८,<br>१२ वा मजला, नवीन प्रशाकीय भवन, मंत्रालय, मुंबई-३२<br>दू.क्र.२२०२२७५४ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३० | सल्लागार मंडळे, राष्ट्रीय सुरक्षा कायदा, १९८०, परकीय चलन, संचय व तस्करी प्रतिबंधक अधिनियम, इत्यादी स्थानबध्दांच्याबाबतीत सल्ला देणे. | सह/उप सचिव, कार्यासन विशा-१० ७ वा मजला दू.क्र.२२८८३३७८ विस्तार-३६५६ | कक्ष अधिकारी/अवर सचिव, कार्यासन विशा-१०, १२ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई-३२, दू.क्र.२२०२५०८० |
| ३१ | विदेशी नागरीकांना (पाकिस्तान व बांगलादेश वगळून) भारतातील अधिवास परवाना देणे/ अधिवास परवान्याला (व्हिसा) मुदतवाढ देणे व तद्नुषंगिक इतर बाबी. उपरोक्त बाबत केंद्र शासनास शिफारशी, परकीय देशांतील कैद्यांच्या प्रत्यार्पणासह झालेले तह, करार व अभिसंधीची अंमलबजावणी करणे, भारतातील विदेश धर्मप्रचारक, विदेशी व्यक्तींचे प्रत्यार्पण इत्यादी. | सह/उप सचिव, कार्यासन विदेशी-१, दा.क्र.५३६ (मुख्य), दू.क्र२२८८३३७८ विस्तार-३६५६ | कक्ष अधिकारी/अवर सचिव, कार्यासन विदेशी-१ ९ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई-३२, दू.क्र.२२०२२६८८ |
| ३२ | वैध व्हिसा घेऊन येणाऱ्या पाकिस्तानी व बांगलादेशी नागरिकांबाबत सर्व बाबी, भारतीय नागरिकत्व, दस्तऐवजांचे साक्षांकन, संरक्षण, पारपत्र व प्रवेशपत्र, विदेशी व्यक्तींचे प्रत्यार्पण, भारतीय नागरिक पारपात्रे इत्यादी. | सह/उप सचिव, कार्यासन विदेशी-२, दा.क्र.५३६ (मुख्य), ५ वा मजला दू.क्र.२२०२४८६९ विस्तार-३३८२ | कक्ष अधिकारी/अवर सचिव, कार्यासन विदेशी-२, ९ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई-३२, दू.क्र.२२०२२६८८ |
| | **तुरुंग** | | |
| ३३ | कारागृह विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी यांच्या आस्थापनाविषयक सर्व बाबी, कैद्यांचे वेतन इत्यादी. | सह/उप सचिव कार्यासन तुरुंग-१ दा.क्र.५४५ (मुख्य), दू.क्र.२२०२८६८८ विस्तार-३७६१ | कक्ष अधिकारी/अवर सचिव, कार्यासन तुरुंग-१ दा.क्र.५४५ (मुख्य), ५ वा मजला, मंत्रालय, मुंबई-३२ दू.क्र.२२०२५१५७ |
| ३४ | कारागृह उद्योग व शेतीविषयक सर्व बाबी, किशोर सुधारालय, कारागृह सुधारणा, कारागृहास वस्तुंचा पुरवठा, पाणीपुरवठा इ. कारागृह नियमांत सुधारणा, कारागृह इमारतींचे बांधकाम इत्यादी. | सह/उप सचिव कार्यासन तुरुंग-२ दा.क्र.५४५ (मुख्य), दू.क्र. २२०२८६८८ विस्तार-३७६१ | कक्ष अधिकारी/अवर सचिव, कार्यासन तुरुंग-२ दा.क्र.५४५ (मुख्य), ५ वा मजला, मंत्रालय, मुंबई-३२ दू.क्र.२२०२५१५७ |
| ३५ | तुरुंगातील कैदी, १४ वर्षीय अहवाल/पॅरोल/फरलो, शिक्षेमध्ये कपात, फाशीची शिक्षा, कैद्यांची बदली, मुदतपूर्व सुटका, वेडे कैदी, कुष्ठरोगी कैदी, कच्च्या कैद्यांच्या बाबीतील सर्व प्रकरणे. | सह/उप सचिव कार्यासन तुरुंग-३ दा.क्र.५४५ (मुख्य), दू.क्र.२२०२८६८८ विस्तार-३७६१ | कक्ष अधिकारी/अवर सचिव, कार्यासन तुरुंग-३, दा.क्र.५४५ (मुख्य), ५ वा मजला, मंत्रालय, मुंबई-३२ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | दू.क्र.२२०२५१५७ |
| | **परिवहन** | | |
| ३६ | वाहने, मार्ग परिवहन सेवा, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ या संबंधीच्या बाबी. | सह/उप सचिव कार्यासन, परिवहन-१, दा.क्र.५३४ अ (मुख्य) दू.क्र.२२०२५३५६ विस्तार-३२२६ | कक्ष अधिकारी/अवर सचिव, कार्यासन परिवहन-१, दा.क्र.५५६ (वि.), ५ वा मजला, मंत्रालय, मुंबई-३२ दू.क्र.२२०२४९६४ |
| ३७ | मोटार वाहने/ स्कूटर व ट्रॅक्टर्स (वितरण व विक्री) नियंत्रण आदेश, मालवाहनातुन माणसांची वाहतूक, मोटार वाहन नियमातून सूट, परमिट, मोटर ट्रेनिंग स्कूल, शासकीय वाहनांवरील लाल दिवे, कायद्यात सुधारणा इत्यादी बाबी. | सह/उप सचिव कार्यासन, परिवहन-२, दा.क्र.५३४ अ (मुख्य) दू.क्र.२२०२५३५६ विस्तार-३२२६ | कक्ष अधिकारी/अवर सचिव, कार्यासन परिवहन-२ दा.क्र.५३९ (मुख्य), ५ वा मजला, मंत्रालय, मुंबई-३२ दू.क्र.२२०२६८१५ |
| ३८ | मुंबई मोटार वाहन कर, रस्त्यावरुन नेण्यात येणारा माल व प्रवासी यांच्यावरील कर, आंतरराज्यीय वाहतुक करार इत्यादी. | सह/उप सचिव कार्यासन, परिवहन-३, दा.क्र.५३४ अ (मुख्य) दू.क्र.२२०२५३५६ विस्तार-३२२६ | कक्ष अधिकारी/अवर सचिव, कार्यासन परिवहन-३ दा.क्र.५५८ (विस्तार), ५ वा मजला, मंत्रालय, मुंबई-३२ विस्तार-३१९२ |
| ३९ | परिवहन विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी यांच्या आस्थापनाविषयक सर्व बाबी. | सह/उप सचिव कार्यासन, परिवहन-४, दा.क्र.५३४ अ (मुख्य), गृह विभाग, दू.क्र.२२०२५३५६ विस्तार-३२२६ | कक्ष अधिकारी/अवर सचिव, कार्यासन परिवहन-४ ७ वा मजला, मंत्रालय, मुंबई-३२ दू.क्र.२२०२६८४८ |
| ४० | मोटार अपघात दावा न्यायाधिकरणांतील अधिकारी/कर्मचारी यांच्या आस्थापनाविषयक सर्व बाबी. रेल्वे व रेल्वेशी संलग्न असलेल्या बाबी, ब्रॉडगेजमध्ये रुपांतर, लेव्हलक्रॉसिंग ओव्हर ब्रिज बांधणे, रेल्वे वाहतूकीसंबंधी बाबी, इत्यादी. | सह/उप सचिव कार्यासन, परिवहन-५, दा.क्र.५३४ अ (मुख्य), दू.क्र.२२०२५३५६ विस्तार-३२२६ | कक्ष अधिकारी/अवर सचिव, कार्यासन परिवहन-५ दा.क्र.५५८ (विस्तार), ५ वा मजला, मंत्रालय, मुंबई-३२ विस्तार-३१९२ |
| | **बंदरे आणि राज्य उत्पादन शुल्क** | | |
| ४१ | देशांतर्गत जलमार्गावरील प्रवासी व माल यांची वाहतुक, बंदरातील जोडणारे रस्ते, इंडियन पोर्ट ॲक्ट, १९०८, लहान बंदरांचा विकास, इत्यादी बाबी. | सह/उप सचिव, कार्यासन बंदरे-१, ७ वा मजला दू.क्र.२२८३५६०४ | कक्ष अधिकारी/अवर सचिव, कार्यासन बंदरे-१ ७ वा मजला, मंत्रालय, मुंबई-३२ दू.क्र.२२०२८३४० |

| | | | |
|---|---|---|---|
| | | विस्तार-३१९१ | |
| ४२ | प्रमुख बंदरांशी संबंधित बाबी, दीपगृहे, प्रकाश नौका, संकेतदीप व इतर तरतूदी, बंदर विभागातील कर्मचाऱ्यांच्या आस्थापना विषयक बाबी इ. | सह/उप सचिव, कार्यासन बंदरे-२, ७ वा मजला दू.क्र.२२८३५६०४ विस्तार-३१९१ | कक्ष अधिकारी/अवर सचिव, कार्यासन बंदरे-२ ७ वा मजला, मंत्रालय, मुंबई-३२ दू.क्र.२२०२८३४० |
| ४३ | मद्यांच्या वापरावरील बंदी व तत्संबंधीची प्रकरणे, परवाने, अवैध विदेशी दारु संबंधीची प्रकरणे इत्यादी. | सह/उप सचिव, कार्यासन रा.उ.शु-२, ७ वा मजला, दू.क्र.२२८३५६०४ विस्तार-३१९१ | कक्ष अधिकारी/अवर सचिव, कार्यासन रा.ऊ.शु-२ दा.क्र.५५३ (वि.) ५ वा मजला, मंत्रालय, मुंबई-३२ दू.क्र.२२०२४९६४ |
| ४४ | देशी दारु, ताडीसंबंधीची सर्व प्रकरणे, निरा नियम, उत्पादन शुल्क करार करणे इत्यादी. | सह/उप सचिव, कार्यासन रा.उ .शु-३ ७ वा मजला दू.क्र.२२८३५६०४ विस्तार-३१९१ | कक्ष अधिकारी/अवर सचिव, कार्यासन रा.ऊ.शु-३, दा.क्र.५५३ (वि.) ५ वा मजला, मंत्रालय, मुंबई-३२ दू.क्र.२२०२४९६४ |
| ४५ | दारुबंदी व उत्पादन शुल्क विभागातील क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी यांच्या आस्थापनाविषयक सर्व बाबी, दारुबंदी प्रचार कार्याबाबतची प्रकरणे. | सह/उप सचिव, कार्यासन, रा.उ.शु-४ ७ वा मजला दू.क्र.२२८३५६०४ विस्तार-३१९१ | कक्ष अधिकारी/अवर सचिव, कार्यासन रा.ऊ.शु-२ दा.क्र.५५३ (वि.) ५ वा मजला, मंत्रालय, मुंबई-३२ दू.क्र.२२०२४९६४ |
| | **इतर** | | |
| ४६ | मुख्यमंत्री धर्मदाय निधीतून मा. मुख्यमंत्र्यांनी/गृह मंत्री यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे देणग्या देणे, सायफर, रेसकोर्स, गोपनीय व गुप्त संकेत इत्यादीबाबत कार्यवाही | सह/उप सचिव, कार्यासन सेकपी-१, ७ वा मजला दू.क्र.२२०२५१३२ विस्तार-३८९१ | कक्ष अधिकारी/अवर सचिव, कार्यासन सेकपी-१, ७ वा मजला, मंत्रालय (मुख्य), मुंबई-३२ दू.क्र.२२०२२८६९ |
| ४७ | पोलीस विभागातील अधिकारी /कर्मचारी यांना अनुकंपा निवृत्तीवेतन, इजा निवृत्ती वेतन मंजूर करणे, गृह विभाग व क्षेत्रीय कार्यालयांसाठी घरबांधणी, मोटार वाहन इ. अग्रीमे मंजूर करणे, निवृत्ती वेतनाबाबतच्या तक्रारी, गृह विभाग/गृह विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय | सह/उप सचिव, कार्यासन आस्था-१, ७ वा मजला, दू.क्र.२२०२३१८४ विस्तार-३६५६ | कक्ष अधिकारी/अवर सचिव, कार्यासन आस्था-१ १२ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई-३२ दू.क्र.२२०२२७५४ विस्तार-३१४६ |

| | | | |
|---|---|---|---|
| | कार्यालयां- कडून प्राप्त माहितीचे समन्वय. | | |
| ४८ | गृह विभागातील अधिकारी /कर्मचाऱ्यांच्या आस्थापनाविषयक सर्व बाबी. | सह/उप सचिव,<br>कार्यासन आस्था-२,<br>७ वा मजला<br>दू.क्र.२२८३५६०४<br>विस्तार-३१९१ | कक्ष अधिकारी/अवर सचिव,<br>कार्यासन आस्था-२,<br>दा.क्र.५५३ (वि.)<br>५ वा मजला, मंत्रालय, मुंबई-३२<br>दू.क्र.२२८८५६२८<br>विस्तार-३९१२ |
| ४९ | गृह विभागात लेखन सामग्री, फर्निचर इत्यादी पुरविणे, हाऊसकिपींग, टपाल आवक-जावक इ. | सह/उप सचिव,<br>कार्यासन आस्था-३,<br>७ वा मजला<br>दू.क्र.२२८३५६०४<br>विस्तार-३१९१ | कक्ष अधिकारी/अवर सचिव,<br>कार्यासन आस्था-३,<br>७ वा मजला, मंत्रालय,<br>मुंबई-३२<br>विस्तार-३८९३ |
| ५० | गृह विभागातील अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन, सेवापुस्तके अद्यावत ठेवणे इत्यादी. | सह/उप सचिव,<br>कार्यासन रोख शाखा,<br>दा.क्र.५४५ (मुख्य),<br>दू.क्र.२२०२८६८८<br>विस्तार-३७६१ | कक्ष अधिकारी/अवर सचिव,<br>कार्यासन रोख शाखा<br>दा.क्र.५४८ (वि.)<br>५ वा मजला, मंत्रालय, मुंबई-३२<br>दू.क्र.२२८५४१६७<br>विस्तार-३२७३ |
| ५१ | गृह विभागाचे अर्थसंकल्पीय अंदाज, केंद्रीय योजनांच्या लाभाबाबत समन्वय, लेखा आक्षेपांबाबत समन्वय इत्यादी. | सह/उप सचिव,<br>कार्यासन, बीयुडी-१<br>७ वा मजला,<br>मंत्रालय (मुख्य)<br>दू.क्र.२२०४९४६४<br>विस्तार-३७३१ | कक्ष अधिकारी/अवर सचिव,<br>कार्यासन बीयुडी-१,<br>१२ वा मजला,नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई-३२<br>दू.क्र.२२०२५०८० |
| ५२ | लोकलेखा समितीशी संबंधित प्रकरणे, कार्यक्रम अंदाजपत्रक तयार करणे, इत्यादी. | सह/उप सचिव,<br>कार्यासन, बीयुडी-२<br>७ वा मजला,<br>मंत्रालय (मुख्य),<br>दू.क्र.२२०४९४६४<br>विस्तार-३७३१ | कक्ष अधिकारी/अवर सचिव,<br>कार्यासन बीयुडी-२,<br>७ वा मजला, मंत्रालय (मुख्य),<br>मुंबई-३२<br>दू.क्र.२२०२२८१७ |

* * * * * *